जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -४१ दिनांक - १६/०१/२०२४**

सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

## वाढदिवसाचा केक धारधार हत्याराने कापुन साजरा करणा-या बड्डे बॉय व त्याच्या साथीदारांना केले जेरबंद

दि.१४/०१/२०२४ रोजी सहकारनगर पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार असे मकर संक्रातीच्या सणाचे अनुशंगाने पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग व गुन्हेगार चेकिंग करीत असताना **पोलीस अंमलदार महेश मंडलीक** यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, के.के.मार्केट सी.एन.जी.पेट्रोल पंपाचे जवळील पाण्याचे वॉटर टँकर पार्कींग जागेत बालाजीनगर धनकवडी पुणे येथे सार्वजनिक ठिकाणी काही इसम त्यांचे हातात लोखंडी तलवार व कोयता घेवुन केक कापण्यासाठी जमले आहेत अशी बातमी मिळाल्याने बातमीचा आशय वरिष्ठांना कळविला असता.

सहकारनगर पोलीस कडील तपास पथकाकडील स्टाफने के.के.मार्केट भागात पंचासह जावुन छापा घातला असता दोन इसम त्यातील एका इसमाचे हातात लोखंडी हत्यार होते व ते समोरील दुचाकीच्या सिटवर ठेवलेल्या दोन केक व त्यांचे भोवती काही इसम घोळका करून थांबलेले दिसले. लोखंडी हत्यार बाळगलेल्या इसमांना तसेच त्यांचे भोवती घोळका करून थांबलेल्या इसमांना जागीच पकडुन ताब्यात घेवुन त्यांना त्याचे नाव पत्ता विचारता त्याचे नाव **१) आदित्य काशीनाथ साबळे वय १८ वर्षे रा.चोरगे बिल्डींग, तीसरा मजला, शिवाजी पुतळयाजवळ बालाजीनगर धनकवडी पुणे २) ऋतीक राजु जाधव वय १९ वर्षे रा.आराधना सोसायटी ऐ वींग पहिला मजला फ्लॅट नं.०२, पुन्याईनगर धनकवडी पुणे ३) रोहीत राजु घोरपडे वय २३ वर्षे रा.बुध्द विहाराजवळ चव्हाणनगर धनकवडी पुणे मुळ रा.बोरूड गल्ली काळा मारूती मंदिराजवळ जि.अहमदनगर ४) आदित्य रमेश क्षिरसागर वय १९ वर्षे रा.भारत नगर, खोपडे नगर, डिपीच्या कारखान्याजवळ निंबाळकरवाडी कात्रज पुणे** असे असल्याचे सांगितले तसेच तलवार बाळगलेल्या एक अल्पवयीन साथीदारास ताब्यात घेतले. त्यांचेकडे चौकशी करता आदित्य साबळे याने माझा व अल्पवयीन साथीदार याचा वाढदिवस असल्याने केक कापण्यासाठी लोखंडी हत्यार जवळ बाळगल्याचे सांगितले.त्याचे कडुन **दोन लोखंडी हत्यारे जप्त** करुन त्याचेविरुध्द सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर १५/२०२४ आर्म अॅक्ट क ४(२५) व महा.पो.अधि. क ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग श्री.नारायण शिरगावकर सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संदीप देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राहुल खंडाळे, सहा.पो उप निरी बापु खुटवड, पोलीस अंमलदार सुशांत फरांदे,भुजंग इंगळे,महेश मंडलिक,अमोल पवार,निलेश शिवतारे, बजरंग पवार,नवनाथ शिंदे, विशाल वाघ, सागर कुंभार, सागर सुतकर यांनी केली आहे.